## मनपा शहरातील नळ जोडणी धारकांनी नळांना मीटर बसविणे बंधनकारक – मनपा प्रशासन

**अकोला** : अकोला शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की , महानगरपालिकेतर्फे नियमित पाणी देयकाचे वितरण करण्यात येत आहे .परंतु असे निदर्शनास आले आहे की नागरिकांनी रीतसर नळ कनेक्शन घेऊन नळाला मीटर बसविलेले नाहीत, अशा नागरिकांना रु ३०० प्रतिमाह याप्रमाणे नो मीटर चे देयक देण्यात येत आहे. नियमित नळ धारकांना १० युनिट पर्यंत प्रतिमाह कमीत-कमी रु. १२० याप्रमाणे आणि १० यूनिट पेक्षा जास्त वापर असल्यास मीटर रिडिंग घेऊन प्रति युनिट रु १२ याप्रमाणे आकारणी करण्यात येत आहेत्यामुळे अकोला शहरातील नागरिकांनी त्यांचे कडील नळ कनेक्शन ला तात्काळ मीटर बसवून त्याची रीतसर नोंद महानगरपालिका पाणीपुरवठा विभागात करावी असे आवाहन कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी केले आहे.

## जवाहर नगरचा राजा



जय बजरंग गणेशोत्सव मंडळ
जवाहर नगर अकोला

# ग्रामीण भागाच्या विकासाकरिता
# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान :खा.अनुप धोत्रे

■जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न




■**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**
ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास देशाच्या प्रगतीचा कणा असून ग्रामीण जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' एक प्रभावी व दूरदर्शी माध्यम ठरेल. या अभियानामध्ये अकोला जिल्ह्याने भरीव कामगिरी करुन जिल्ह्याचा नाव लौकीक करावा, असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले. ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, कर्मचारी- अधिकारी यांच्यासाठी आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत बोलत होते.

आमदार अमोल मिटकरी, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त राजीव फडके, जि.प चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, उपजिल्हाधिकारी महेश परांडेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे आदी उपस्थित होते.खा.धोत्रे म्हणाले की, 'राज्यातील ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येय्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी आणि ग्रामविकासात लोकसहभाग निर्माण करण्यास नवी ऊर्जा निर्माण करण्याचे काम हे अभियान करेल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी ग्रामपंचायत स्तरावरील कर भरण्याची सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध व्हावी या उद्देशाने अकोट पंचायत समिती अंतर्गत रोहनखेड ग्रामपंचायतने उपलब्ध केलेल्या क्यू आर कोडचे अनावरण करण्यात आले.

आ. मिटकरी म्हणाले की, प्रत्येक गावाने पुढाकार घेत आधुनिक व पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्यप्रणाली राबबाबी. स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. तसेच अधिकारी-कर्मचारी यांनी गावापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्यपुर्ण प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ग्राम स्तरावर विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्वाचे आहे. ग्रामपंचायत कडून आकारल्या जाणारा कर वेळेवर म्हणजे दर महिना भरून नागरिकांनी ग्रामपंचायतला सहकार्य करावे, यामध्ये सरपंचांनी पुढाकार घ्यावा तसेच कर भरण्याची सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.

## हिवरखेड मंडळात ८२ मिली तर अडगाव मडंळात ६५.५ मिली पाऊसाची नोंद

■**तेल्हारा,दि ४ (प्रतिनिधी) :**
तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शेतातील पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित मदत द्यावी अशी मागणी होत आहे.



तेल्हारा तालुक्यात दोन सप्टेंबर रोजी मोठ्या प्रम ाणात मुसळधार पाऊस आल्याने शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामध्ये हिवरखेड मंडळात ८२ मिलि तर अडगाव मडंळात ६५ ५ मिलि पाउस झाल्याचि माहिति महसूल विभागाने दिली या मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ६५ मिली पाऊस झाला म्हणजे अतिवृष्टी झाली असे शासनाचे निकष आहेत म त्र सध्या यापेक्षाही अधिक प्रमाणात पाउस आल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी या दोन्ही मंडळात येणाऱ्या गावातील शेति पिकाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित मदत करावि अशि मागणि शेतकरी यांनी केले आहे.तालुक्यातील हिवरखेड अडगाव मडंळात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याचि नोंद महसूल विभागात झालि आहे दोन दिवसांपासून दोन्ही मंडळात येणाऱ्या गावातील शेती पिकांचे पंचनामे करण्यात येतील तहसीलदार यांनी सांगितले.

# ईद-ए-मिलादची मिरवणूक

## ९ सप्टेंबर रोजी शाळा महाविद्यालयांना सुट्टी

■**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**
अकोला जिल्ह्यातील मुस्लिम बांधवांनी ईद-ए-मिलादची मिरवणूक दि. ५ सप्टेंबरऐवजी दि. ९ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेतला असून शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.दि. ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादची मिरवणूक ईद-ए-मिलादुन्नबी मि रवणूक तसेच दि. ६ सप्टेंबर रोजी श्री गणेश उत्सव मिरवणूक म ागेपुढे असल्याने समाजात एकता अखंडता असावी याकरिता अकोला जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांनी ईद-ए-मिलादुन्नबी मिरवणूक दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने सर्व मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलाद चा उत्सव साजरा करणे सोयीचे होईल, याकरिता दि. ९ सप्टेंबर रोजी सार्वजनिक सुट्टीचा आदेश होणेस जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी विनंती केली आहे.दि. २ ऑगस्ट २०१९ नुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या आदेशाद्वारे दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला शहरातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहिर करण्यात येत आहे.

## उमरी परिसरात टोळीने केला युवकावर प्राणघातक हल्ला

**अकोला:** तीन दिवस आधी खदान पोलिस स्टेशन परिसरात एका फर्निचर व्यावसायिक युवक सुफियान खान ची हत्या झाल्याची शाई वाळत नाही तोच उमरी परिसरात एका युवकावर बुधवारी रात्री १२ वाजताच्या दरम्यान एका टोळक्याने प्राण घातक हल्ला केल्याने अजिंक्य ब्रह्मानंद बोदळे नामक युवक गंभीररित्या जखमी झाला या युवकावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्याअजिंक्यब्रह्मानंद बोडखे यास त्वरित खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे जखमी अजिंक्यची हालत चिंताजनक असल्याचे बोलले जात आहे सिव्हिल लाइन पोलिसांनी त्वरित चक्रे फिरवीत मोठी उमरी निवासी गण्या उर्फ गणेश गजानन तिडके, दीपक रामेश्वर वानखडे प्रथमेश छोटू आरी व गौरव राजेंद्र दिपके या चौघांना ताब्यात घेतले आहे हा प्राणघातक हल्ला कुठल्या कारणाने झाला याचा तपास पोलीस करीत आहेत ३१ ऑगस्टला खदान पोलिसांच्या हद्दीतील मलकापूर येथील रेल्वे पुलाच्या बोगद्याजवळ किरकोळ

गैरसमजुतीतून उफाळलेल्या वादाचे रूपांतर सशस्त्र हल्ल्यात झाले या घटनेत फर्निचर व्यावसायिक सुफियान खान याची हत्या करण्यात आली त्यानंतर मंगळवारी रात्री मोठी उम री परिसरात अजिंक्य बोदळे या युवकावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने शहरात चाललय तरी काय?

## थोडक्यात

### छळ करणाऱ्या आरोपीचा जामीन फेटाळला!

**अकोट :** स्वतः च्या ४ वर्षीय स्वतःच्या मुलीचा लैंगिक छळ करणारा आरोपी मुशरफखॉं अफसरखॉं (३०) रा. इंदिरा नगर हिवरखेड याने जमानतीसाठी केलेला अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळून लावला आहे. २४ ऑगस्ट रोजी रात्री २ वाजताच्या सुमारास पीडिता चार वर्षिय मुलीचा रडण्याचा आवाज आला असता तिच्या आईने झोपेतून उठून पाहिले. त्यावेळी आरोपी पती हा मुलीचा सलवार काढताना दिसून आला. पीडितेच्या आईला काहीतरी वाईट घडत असल्याचे लक्षात आल्याने तिने आरोपी पती मुशरफखॉं अफसरखॉं याच्याविरूध्द हिवरखेड पोलिस स्टेशनला फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. दरम्यान आरोपीने जमानत न्यायालयात मिळण्यासाठी अर्ज केला. सरकारी वकील अजित देशमुख यांनी युक्तिवादात विविध मुद्दे उपस्थित करून जमानतीसाठी विरोध केला. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपी आरोपी मुशरफ खॉं अफसरखा याचा जमानत मिळण्यासाठी केलेला अर्ज नामंजूर केला.

### घरफोडीतील आरोपींना अटक!

**अकोला :** शहरातील रामदास मठाजवळील भाड्याच्या घरात राहणाऱ्या एका व्यक्तीच्या घरात ३१ ऑगस्ट रोजी घरफोडी केल्याची घटना घडल्यानंतर या प्रकरणी अकोट फैल पोलिस स्टेशन येथे तक्रार देण्यात आली. या चोरीच्या प्रकरणाचा तपास करून अकोट फैल पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. अकोट फैल पोलिस स्टेशच्या हद्दीतील रहिवासी असलेले ताज मोहम्मद हजारी खान (४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तींनी घरात प्रवेश करून तीन मोबाइल फोन व बॅगेतील रोख दहा रुपये चोरून नेले होते. या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. अकोट फैल पोलिसांनी आरोपी करण ऊर्फ दाद इंगळे (२१), कार्तिक लाखे, (२३), आणि अक्षय भांगे (२८) तिघेही रा. अकोट फैल या आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींकडून तीन मोबाइल व रोख तीन हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी, पोलिस निरीक्षक रहिम शेख यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस उपनिरीक्षक अनिस पठाण, योगेश काटकर, संतोष चिंचोलकर, लीलाधर खंदारे आणि आमिर शेख यांनी केली.

## अकोट रेल्वे स्थानक: अंधार, अस्वच्छता आणि असुरक्षितेचे स्थानक!

■**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**
प्रवाशांना सुविधा देण्याऐवजी गैरसोयींचे केंद्र बनलेले अकोट रेल्वे स्थानक सध्या प्रचंड चर्चेत आहे. येथील दुरवस्थेमुळे प्रवाशांना अक्षरशः नरकयातना भोगाव्या लागत आहेत. एकीकडे 'स्वच्छ भारत' अभियानाच्या मोठमोठ्या घोषणा दिल्या जातात, तर दुसरीकडे अकोट रेल्वे स्थानकावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे.



**घाण आणि अस्वच्छतेचा विळखा**

रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफफॉर्मवर सर्वत्र घाण पसरली आहे. कचरा, घाण पाणी आणि इतर अस्वच्छ वस्तूंमुळे प्रवाशांना प्लॅटफफॉर्मवर उभे राहणेही कठीण झाले आहे. याव्यतिरिक्त, प्लॅटफफॉर्मच्या काही भागांमध्ये प्रवाशांनी तात्पुरती चूल मांडून जेवण बनवल्याचे चित्रही अनेकदा पाहायला मिळते, ज्यामुळे स्वच्छतेची आणखीनच दुरवस्था झाली आहे.

**असुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

या स्थानकाची दुर्दशा केवळ अस्वच्छतेपुरती मर्यादित नाही. रात्रीच्या वेळी प्लॅटफफॉर्मवर पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्यामुळे अंधार असतो. अशा परिस्थितीत, काही वेळेस रेल्वे पोलीस किंवा सुरक्षा कर्मचारी उपस्थित नसल्याने प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर आहे. या परिस्थितीचा फायदा घेत काही बेघर आणि भटके लोक प्लॅटफफॉर्मवरच आपला मुक्काम करतात, ज्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. भटक्या लोकांच्या वास्तव्यामुळे प्रवाशांना त्रास होतोच, पण सुरक्षेचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

हे स्थानक शहराचे प्रवेशद्वार आहे, पण या दुर्दशेमुळे शहराचीच प्रतिमा मलीन होत आहे. प्रवाशांच्या सुरक्षित आणि सुखद प्रवासासाठी रेल्वे प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. अन्यथा, हे 'घाणीचे साम्राज्य' अकोटच्या प्रगतीवरच एक डाग ठरेल. रेल्वे प्रशासनाने या गंभीर समस्येची दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात. स्थानकाची योग्य साफसफाई करून, प्लॅटफफॉर्मवर असलेली अतिक्रमणे वेळोवेळी हटवावीत आणि रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था व सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, अशी मागणी प्रवाशांकडून जोर धरत आहे.

**अकोट रेल्वे स्थानकावर तातडीने स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक, रेल्वे पोलिसांची नियुक्ती आणि पुरेशी लाईट व्यवस्था करण्यात यावी. तसेच प्रत्येक गाडीतील तिकीट तपासणी नियमितपणे सुरू करण्यात यावी.**
**-विजय जितकर, अकोट रेल्वे प्रवासी संघटना**

## अकोला जिल्हा समता परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना निवेदन



■**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**
जिल्हा समता परिषदेच्या वतीनेजिल्ह्यातील समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने अकोला जिल्हाअधिकारी यांना निवेदन देऊन ओबीसींच्या आरक्षणा संदर्भात चर्चा केली.

याप्रसंगी अकोला जिल्हा समता परिषदेचे अध्यक्ष गजानन म्हैसणे अमरावती विभागीय संघटक गजाननराव इंगळे माजी आमदार बळीराम सिरस्कार माजी आमदार हरिभाऊ भदे माजी आमदार नारायणराव गव्हाणकर माजी आमदा ज्ञानदेवरावर ठाकरे जि प माजी अध्यक्ष संगीता आढाव माया इरतकार प्रकाश बिरकड जिल्हा विजय कौसल शत्रुघ्न बिरकडश्रीराम पालकर समता परिषद शहराध्यक्ष राम जोगतोळे समता परिषदेचे उपाध्यक्ष विनोद मिरगे गजानन भारताचे विजय गाडगेश्र सदाशिव शेळके अशोकश्र बोळे शंकर काकड दामोदर हागे मधुकर देवकर चक्र चक्रधर राऊत गजानन वाघमारे महादेवराव साळवेसुभाष भाड किशोर रौंदळे मुकेश इंगळे सुनील डाकोलकर सुरेश बोचरे किशोर सोनवणे सुनील उंबरकर नंदकिशोर बहादुरे अंकुश राऊत एडवोकेट प्रकाश दाते गणेशराव काळपांडे जगदीश तायडे नरेंद्र खवले संतोष बिलबिले दीपक गोलडे भास्कर राऊत अशोक भराड समता परिषदेचे जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रसंगी उपस्थित होते.

# गणेशोत्सव पुरस्काराची परंपरा महान-पोलीस अधिक्षक

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**अकोला** : महानगरातील श्री विसर्जनाला मोठी परंपरा लाभली असून हा महोत्सव सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनला आहे. अश्या या पावन उत्सवात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून मंडळांना पुरस्कार देण्याचे कार्य प्रशंसनीय असून ही मिरवणूक शांततेत पार पाडून उत्सव मन मोकळे पणाने साजरा करण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गतवर्षीच्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या उत्कृष्ट गणेश मंडळांना उत्कृष्ट मुर्ति, देखावा, नयनरम्य रोषनाई, शिस्तबद्ध मंडळ,आखाडा अश्या विविध उपक्रमासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गुरुवारी विद्यानगर परिसरातील हॉटेल ग्रीनलँड कॉटेज सभागृह येथे संपन्न झालेल्या या पारितोषिक वितरण सोहळ्यात अर्चित चांडक बोलत होते.ते म्हणाले, जिला पोलीस प्रशासनाने पण स्पर्धा आयोजित केली आहे त्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष एड. मोतीसिंह मोहता यांच्या अध्यक्षतेत संपन्न या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलिस अधिक्षक




अर्चित चांडक,अतिरिक्त पोलीस अधिक्षक रेड्डी,माजी मंत्री व मंडळाचे माजी अध्यक्ष गुलाबराव गावंडे,शेतकरी नेते प्रकाश पोहरे,जेष्ठ पत्रकार राजीव पिसे, आरआरसी चे संचालक पंकज देशमुख, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी संग्राम गावंडे, रमाकांत खेतान, सिद्धार्थ शर्मा,एड सुभाषसिह ठाकूर,मनोहर पंजवाणी, विजय तिवारी,मनोज खंडेलवाल, केशव पातोड, विजय जयपिल्ले, संतोष पांडे, निरज शाह, मनोज साहू,दिलीप खत्री, जयंत सरदेशपांडे,गणेश सारसे,मंगेश काळे,लखन बरडीया आदी उपस्थित होते.श्री गणेशाच्या आरती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे दिवंगत सदस्य यांच्या सामूहिक श्रद्धांजलीने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.प्रास्ताविक मंडळाचे महासचिव विजय तिवारी यांनी करून १३५ वर्षापासून महानगरात निघत असलेली श्री विसर्जनाची पारंपारिक मिरवणूक व मंडळाच्या वतीने करीत असलेल्या पुरस्कार वितरणाची माहिती दिली.यावेळी माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या नंतर शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी गणेशोत्सव व प्रगतीचा मापदंड मांडून गणेशोत्स व मंडळांनी धार्मिक उन्माद टाळण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषण एड मोतिसिंह मोहता यांनी करून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने श्री मिरवणुकीत कर्कश वाद्य न वाजवून नागरिकांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम टाळावा असे आवाहन करीत पारितोषिक प्राप्त मंडळांना शुभेच्छा दिल्यात. यानंतर गतवर्षीच्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या विविध श्रेणीतुन निवडलेल्या उत्कृष्ट गणेश मंडळाचा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.यात स्व. कमलादेवी खेतान यांच्या स्मृतित उत्कृष्ट झाकीसाठी अर्जुन सम ाज व खोलेश्वर शिवभक्त मंडळ यांना स्व. गोदावरी देवी मोहता यांच्या स्मृतित अष्टविनायक गणेशोत्सव मंडळ मलकापूर,गणराज गणेशोत्सव मंडळ कलाल चाळ यांना,स्व. कृष्णादेवी ठाकूर यांच्या स्मृतित जागेश्वर गणेशोत्सव मंडळ जुने शहर, जाणता राजा गणेशोत्सव मंडळ दीपक चौक यांना, स्व.परियलदास पंजवानी यांच्या स्मृतित गोरक्षण रोड का राजा,बजरंग गणेशोत्सव मंडळ खुले नाट्य गृह यांना,स्व.मंगेशभाऊ गावंडे यांच्या स्मृतित उत्कृष्ट आखाडासाठी रामभरोसे आखाडा शिवसेना नगर,छत्रपती गणेशोत्सव मंडळ शिवाजी पार्क यांना, स्व. गीतादेवी खत्री यांच्या स्मृतित देखावासाठी बालक गणेशोत्सव मंडळ सिंधी कॅम्प,इश्चेश्वर गणेशोत्सव मंडळ सिंधी कॅम्प यांना दिला.

महासागर •शुक्रवार,दि.५ सप्टेंबर २०२५

अकोला पान ६

# अकोल्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आ.अमोल मिटकरी यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी आज आमदार अमोलदादा मिटकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक घेतली.

या बैठकीत पिकविमा प्रकरणे, वीजपुरवठा, सिंचन व्यवस्था, बाजारातील अडचणी तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, तसेच त्यांचे प्रश्न समन्वयातून मार्गी लागावेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना आमदार मिटकरी यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या.शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढणे ही शासनाची जबाबदारी असून, यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असेही आमदार मिटकरी यांनी या वेळी सांगितले.बैठकीस जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अशी माहिती जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे यांनी दिली.



## सुफियान खानच्या हत्येचा सीन रिक्रिएट

**अकोला:** खदान पोलिसांच्या हद्दीतील मलकापूर येथील रेल्वे पुलाच्या बोगद्याजवळ किरकोळ गैरसमजुतीतून उफाळलेल्या वादाचे रूपांतर सशस्त्र हल्ल्यात झाले या घटनेत फर्निचर व्यावसायि २५ वर्षीय सुफियान खान शमशुद्दीन खान याचा एक सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला स्थानिक गुन्हे शाखे तातडीने कारवाई करत अवघ्या बारा तासात एका अल्पवयीनासह पाच आरोपींना अटक केली. पोलिसांनी आज गुरुवारी या हत्येचा सीन रीक्रिएट केला, हत्याकांडातील आरोपी फैजान खान मुशर्रफ खान, अब्दुल्ल अरबाज अब्दुल ईसमाईल, शोएब अली उर्फ राजा तय्यब अली, शेख असलम शेख अकबर तसेच सय्यद शहबाज उर्फ सोनू सय्यद मुजीब या पाचही आरोपींना खदान पोलिसांनी मलकापूर परिसरातील रेल्वे पुलाच्या बोगद्या जवळील घटनास्थळी आणले होते पोलिसांनी या ठिकाणी आरोपीकडून हत्येचा सीन रिक्रिएट करून घेतला, याप्रसंगी पोलिसांसोबत फॉरेन्सिक एक्सपर्ट सुद्धा उपस्थित होते, घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

# तेल्हारा शहर व तालुकामध्ये सुरु असलेले विविध अवैध धंदे त्वरित बंद करा



## विविध पक्षसंघटनातर्फे ठाणेदारास निवेदन

■तेल्हारा,दि ४ (प्रतिनिधी) :

सध्याच्या परीस्थित तेल्हारा शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधधंदे खुले आम सुरु असल्याचे दिसुन येत आहे या मुळे शहर व तालुक्यात कायदा व सुव्यवस्था कोणत्याही क्षणी बिगडू शकते सुरु असलेले व पुढील धार्मिक सन महाराष्ट्र राज्य म होत्सव गणेशत्सव, दुर्गात्सव, दिवाळी व विविध धार्मिक महोत्सव पाहता कायदा व सुव्यवस्था अभाधीत राहावे या करिता अवैधधंदे वर त्वरित कार्यवाही करण्यात यावी या मध्ये तेल्हारा शहरात व तालुक्यात मोठ्या प्रमाणात चोरीचे प्रमाण वाढले आहे यामुळे नागरिकांज मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.शहर व तालुका मध्ये गौवंश मोठ्या प्रमाणात चोरीला जाऊन अवैध रित्या कलन होऊन मोठ्या प्रमाणात मास विक्री होत आहे यामुळे गौ प्रेमी व हिंदु समाजा मध्ये भावना दुखवुन नाराजी चे वातावरण निर्माण झाले आहे.

शहर त तालुक्या मध्ये गांजा, गुटका, अवैध दारू, वरली मटका, जुगार, खुलेआम विक्री होत आहे या मुळे युवा वर्गाचे भविष्य अंधारात दिसत आहे.

महाराष्ट्र राज्य महोत्सव गणेशत्सव मध्ये वाजणारे वाद्य आपल्या मते अपारंपरिक असेल तर पाहटे चार वाजता पासुन अनधिकृत भोंगे वाजत आहे हे पारंपारिक आहे का ? या अनधिकृत भोंगे मुळे शिक्षण करणारे मुले तसेच शासकीय कर्मचारी वर्ग यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो यामुळे तेल्हारा पोलीस प्रशासना बद्दल रोश व्यक्त होत आहे शहर व तालुक्या मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध वाहतुक तसेच शाळा परिसर शहरातील मुख्य चौकामध्ये ट्रॉफिक पोलीसचे दुर्लक्ष असल्याने चीडीमारी व रहदारीला फाटा फुटत आहे.या सर्व बाबी आपण गांभीर्याने घेऊन तेल्हारा शहर व तालुका मध्ये सुरु असलेले विविध अवैधधंदे त्वरित बंद करावे.

# पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक संपन्न






■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

दिनांक २७.०८.२०२५ पासुन जिल्हयात सर्वत्र श्री गणेश उत्सवाला सुरवात झाली असून ईद ए मिलाद पण लवकरच असणार त्या अनुषंगाने संपुर्ण अकोला जिल्हयात उत्सव कालावधी शांतता व सुव्यवस्थेच्या वातावरणात साजरा होण्यासाठी मा. श्री अर्चित चांडक पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेश उत्सव व ईद ए मिलाद संबंधाने सर्व उपाययोजना व तयारी पुर्ण करण्यात आली आहे.आज दि. ०३/०९/२०२५ रोजी सायंकाळी १७/०० वा अकोला शहर विभागाची पोलीस लॉन राणी महल येथे. मा. पोलीस अधीक्षक सा. यांच्या मार्गदर्शना खाली, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सतीष कुळकर्णी, यांचे प्रमुख उपस्थिती मध्ये व शांतता समिती सदस्य, गणपती मंडळ अध्यक्ष व कार्यकर्ते यांची बैठक घेण्यात आली.कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. त्यानंतर कार्यकामाचे प्रास्तावीक पोनि मनोज केदारे ठाणेदार खदान यांनी केले. त्यांनंतर उपस्थिती मध्ये व शांतता समिती सदस्य, गणपती मंडळ अध्यक्ष व कार्यकर्ते यांचे सोबत - संवाद साधत महोत्सवा दरम्यान येणा-या अडचणी बाबत चर्चा केली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सतीष कुळकर्णी यांनी आपले मनोगतात मंडळांना पारंपारीक वादयांचा वापर करून आपली संस्कृती चे दर्शन घडवावे तसेच मुस्लीम बांधवांचा ईद ए मिलाद उत्सवाच्या संबंधाने माहिती दिली.

## महापालिका निवडणूक प्रभाग रचना

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

अकोला महानगर पालिकेची २०२५ मध्येहोणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीची तयारी सुरू झाली असून, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी प्रभाग रचनेचा कच्चा आराखडा जाहीर केला आहे. या प्रभाग रचनेवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यासाठी बुधवार, ३ सप्टेंबर रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. पण, अतिशय कमी कालावधी हरकतीसाठी ठेवला गेला आहे अशी ओरड होत आहे.

महापालिका प्रभाग रचनेचा ज्या नागरिकांना या प्रभाग रचनेवर हरकती किंवा सूचना मांडायच्या आहेत, त्यांना ८ सप्टेंबर, २०२५ (सोमवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत संबंधित प्रभाग कार्यालय, निवडणूक कार्यालय किंवा मनपा आयुक्त कार्यालयात लेखी अर्ज सादर करता येणार आहे.

## बालकुमारांची रंगभरण स्पर्धा उत्साहात संपन्न



■पातुर,दि ४ (प्रतिनिधी) :

येथील लोकमान्य टिळक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी बालकुमारांची चित्र रंगभरण स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होत आपली कला सादर केली. लहानग्या चित्रकारांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेला रंगत आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पातूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष व केंद्रीय अंकुर साहित्य संघाचे संघटक देवानंद गहिले होते. यावेळी रंगभरण स्पर्धेत विविध गटांमध्ये विजेत्यांचा गौरव करण्यात आला. विजेते विद्यार्थी क्रीशा प्रकाश चुनडे प्रथम नर्सरी - खुशी राहुल राठोड (प्रथम) पहिली इयत्ता -नक्श सचिन घोलप (प्रथम), गौरी गणेश सावकार (द्वितीय), गिरीश सतीश ढोणे (तृतीय) पाचवी इयत्ता - श्रावणी किशोर चुनडे (प्रथम), स्वराज राहुल शिंदे (द्वितीय), आर्या राहुल राठोड (तृतीय), करण नंदू देवकर (विशेष पारितोषिक) नववी इयत्ता - (प्रथम) विजेता गौरविण्यात आला विजेत्यांना मुख्य अतिथी व अध्यक्ष देवानंद गहिले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## गणेश दर्शन



■श्री. महारुद्र हनुमान मंडळ खेडकर नगर अकोला



■श्री.गणपती बाप्पा मोरया, विदर्भात पारपारिक शेतीला उद्यानिकी फळ फुल शेतीची जोड आवश्यक आहे




■रतनलाल प्लॉट चौक,अकोला.

## नेताजींच्या स्मारकाचा अपमान रोखा; मनपाला आमदार मिटकरींचा इशारा

■आमदार अमोल मिटकरींचा मनपाला सज्जड दम



■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

शहराच्या मध्यवर्ती भागातील सुभाष चौकात उभारण्यात आलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याची विटंबना होत असल्याचे चित्र समोर आले आहे. पुतळ्याभोवती साचलेली घाण, नागरिकांची लघुशंका आणि रात्रीच्या वेळी पुतळ्यालगत गाड्या उभ्या करण्याच्या प्रकारामुळे राष्ट्रपुरुषाच्या स्मारकाचा अपमान होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.ही परिस्थिती प्रत्यक्ष पाहून आमदार अमोल मिटकरी संतापले. त्यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून जाब विचारला. पुतळ्याला तातडीने कंपाऊंड घालणे, संपूर्ण परिसराची साफसफाई करणे आणि अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायम स्वरूपी कारवाई करणे याचे आदेश त्यांनी दिले.'इतक्या वर्षांत हे काम का झाले नाही?' असा थेट सवाल आमदार मिटकरींनी अधिकाऱ्यांना करत कानउघडणी केली. या पुढाकारामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, नेताजींच्या स्मारकाच्या जतनासाठी घेतलेले आमदारांचे पाऊल कौतुकास्पद ठरत आहे.

## शिक्षक दिनानिमित्त वऱ्हाडी हास्य कवी संमेलनाचे आयोजन

**हिवरखेड :** पाच सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त माजी उपसरपंच रमेश दुतोंडे व माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सुलभाताई दुतोंडे वऱ्हाडी हास्य कवी संमेलनाचे आयोजन केले आहे. हास्य कवी प्रा. संजय कावरे व नितीन वरणकार हास्याचा दरबार भरवणार आहेत. निवेदक व गझलकार गोपाल मापारी आहेत.संमेलनाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते वासुदेव निंबोकार असून भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल गावंडे यांच्या हस्ते संमेलनाचे उदघाढ होणार आहे.या कार्यक्रमात सर्व शिक्षकांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात येईल. शिक्षकांना निदान एक दिवस तरी सहकुटुंब मनमोकळे हसता यावे यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची प्रतिक्रिया रमेश दुतोंडे यांनी दिली.

# तांदळी बुजुर्ग येथे युवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंडळाचा जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

### युवकांचा प्रचंड प्रतिसाद आर.आय..शेख . गुरुजींचे मार्गदर्शन

■।पातुर,४ (प्रतिनिधी) :

तांदळी बुजुर्ग येथे युवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंडळातर्फे जनजागृती कार्यक्रम भव्यदिव्य वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला गावातील तसेच परिसरातील युवक, बालक व महिलांनी प्रचंड प्रतिसाद दिला.गेल्या दोन महिन्यांपासून युवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ गावातील लहान मुला-मुलींसाठी विविध उपक्रम राबवीत आहे. या उपक्रमांतून सुसंस्कार, नित्यनेमाने सर्वधर्म समभाव प्रार्थना, सामुदायिक उपक्रम घेतले जात आहेत. मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरत असून गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे.या प्रसंगी अखिल भारतीय गुरुकुल, मोझरी येथील जीवन प्रचारक, महाराष्ट्रभर ख्याती प्राप्त असलेले आदरणीय आर.आय.शेख . (गुरूजी) गुरुजी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी गेल्या काही महिन्यांपासून प्रत्येक शनिवार-रविवारी गावात येऊन लहान मुलांना प्रेरणा दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे तांदळी बुजुर्गसह परिसरात भजन मंडळांच्या माध्यमातून सामाजिक जागृतीचे कार्य जोमाने सुरू आहे.कार्यक्रमामध्ये विशेष आकर्षण ठरलेले राहीत येथील बाल-बालिका भजन मंडळ यांचे मनमोहक सादरीकरण होते. भजन, सामूहिक प्रार्थना



व सामाजिक संदेश यामुळे वातावरण भावनिक व उत्साही झाले.या कार्यक्रमाचे आयोजक युवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ, जय बजरंग गणेश मित्र मंडळ, तसेच तांदळी बुजुर्गचे ग्रामस्थ होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आदरणीय आर. आयशेख गुरुजी, प्रा. विलास राऊत सर, शिवाजी दादा म्हैसणे, गुरुदेव सेवा मंडळ पातूरचे अध्यक्ष संजय दादा पाटील इंगळे, तालुका सेवा अधिकारी बाळाभाऊ सरोदे, भानुदास दादा कराळे, दिलीप दादा कराळे, शुभम दादा कवरणकर, मंगेश कराळे, देवानंद भाऊ गहिले, राजूभाऊ कुसतकार, गणेश बेले, संकेत गावंडे, नितीन डहाळे, अशोक गावंडे, कृष्णा डहाळे, संदीप दादा गिरी, मंगेश दादा कराळे अकोला पुंडलिक बराटे, मंगेश दादा राऊत, प्रवीण राऊत आदि उपस्थित होते.

## मनपाने डास निर्मूलन मोहीम राबवण्याची गरज

अकोला : पावसाळ्यामुळे सर्वत्र पाणी साचणे व ओलसरपणाचे प्रमाण वाढले असून, डेंग्यू व मलेरियासारख्या आजारांचा धोका गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने डास निर्मूलन मोहीम राबवण्याची गरज असल्याचे भाजपचे मलकापूर प्रभाग क्रमांक चौदाचे विभाग प्रमुख राजेश वगारे यांनी निवेदनातून म्हटले आहे. त्यांनी पुढे म्हटले.

**CHANGE IN NAME**

**Old Name : Mohammed Aadil**
**New Name : Mohammad Aadil Mohammad Aleem**
**Passport No. N0548444**
Address: Sami Plot Patur Tq Patur Distt.Akola 444501 Maharashtra (India)

# अकोट फैल येथे गणेश विसर्जन साठी कुत्रीम गणेश विसर्जन घाट

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

स्थानीय अकोट फैल परिसरातील गणेश भक्तांसाठी अकोट फैल येथे कुत्रीम घाट साकार करण्यात आला आहे.सालाबादप्रमाणे यावर्षीही हा उपक्रम भाजपा रेल्वे स्टेशन मंडळ व जागृती फाउंडेशनचे अध्यक्ष नितिन राऊत यांनी गणेश भक्तांसाठी साकार केला आहे. अनंत चतुर्दशी दि ६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते साय ६ वाजेपर्यंत हा कुत्रीम व सुंदर घाट हनुमान मंदिर, हनुमान चौक,अकोट फैल येथे स्थापित करण्यात आला आहे.या घाटचा लाभ लाडिस फैल, परदेशी पुरा, मोची पुरा, संत कबीर नगर, बापू नगर, शंकर नगर, भोई पुरा, साधना चौक, डॉ आंबेडकर चौक, अन्नाभाऊ साठे नगर,पीपल फैल, टाइगरवाड़ी, भीम चौक, वार्ड नं. २ च्या सर्व गणेश भक्तांना घेता येणार आहे.आ रणधीर सावरकर, खा अनुप धोत्रे,आ वसंत खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने,माजी महापौर विजय अग्रवाल,युवा मोर्चा अध्यक्ष पवन महल्ले यांच्या मार्गदर्शनात नितीन राऊत यांनी आयोजित केलेल्या या कुत्रीम गणेश घाट उपक्रमाचा सर्व गणेश भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन जागृती फाउंडेशनचे अध्यक्ष नितिन राऊत यांनी केले.



## कृषी पदवीधरांचा गौरव !

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'शेतकरी आयडॉल' व 'कृषी पदवीधर आयडॉल' या उपक्रमांतर्गत सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ या दोन महिन्यांसाठीचे आयडॉल जाहीर करण्यात आले आहेत.भंडारा जिल्ह्यातील मु. डब्बा, पो. धारगांव येथील प्रयोगशील उद्योजक शेतकरी व सन २०२२ चे वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी प्रकाश गोपीचंद मस्के यांची 'शेतकरी आयडॉल' म्हणून निवड करण्यात आली आहे. तर अमरावती जिल्ह्यातील मोशी येथील कृषी पदवीधर उद्योजक श्रीकांत रमेशपंत गणोरकर यांची 'कृषी पदवीधर आयडॉल' म्हणून निवड झाली आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला

मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

